**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
डॉ. हेडगेवार सेवा समिती, कृषि विज्ञान केंद्र
नंदुरबार

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 08-07-2025**

**नंदुरबार(महाराष्ट्र) साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-07-08 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2025-07-09 | 2025-07-10 | 2025-07-11 | 2025-07-12 | 2025-07-13 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 16.0 | 10.0 | 8.0 | 5.0 | 4.0 |
| कमाल तापमान (अं.से) | 31.0 | 31.0 | 31.0 | 31.0 | 30.0 |
| किमान तापमान (अं.से) | 23.0 | 23.0 | 23.0 | 23.0 | 23.0 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 88 | 88 | 87 | 87 | 87 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 63 | 63 | 59 | 65 | 66 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 12 | 12 | 14 | 15 | 16 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 242 | 243 | 248 | 247 | 241 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 7 | 8 | 8 | 8 |
| चेतावणी | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल | गडगडाटी वादळे आणि विजा, स्कॉल | चेतावणी नाही | चेतावणी नाही | चेतावणी नाही |

## भविष्यवाणी सारांश:

भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त हवामान अंदाजानुसार पुढील दोन दिवस तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे त्यानंतर पुढील तीन दिवस हलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. कमाल तापमान ३० ते ३१ अंश सेल्सिअस तर किमान तापमान २३ अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे. दि. १३ ते १९ जुलै २०२५ दरम्यान मध्य महाराष्ट्रात पाऊस सरासरीऐवढा पडण्याची शक्यता आहे तसेच कमाल व किमान तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे.

## हवामान चेतावणी (पुढील दिवशी 08:30 IST पर्यंत वैध):

दिनांक ८ व १० जुलै २०२५ रोजी नंदुरबार जिल्ह्यात तुरळक ठिकाणी गडगडाटी वादळे आणि विजा, वादळ इ. राहून हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पावसाची शक्यता आहे.

## हवामान चेतावण्यांचे कृषीवरील संभाव्य प्रभाव आणि संबंधित एग्रोमेट सल्ले:

| |
|---|
| सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान होऊ शकते. जोरदार वारा वृक्षारोपण, बागायती आणि उभ्या पिकांचे नुकसान करू शकतो. |

## कृषि सल्ला:

| |
|---|
| हवामानाचा अंदाज व पीकनिहाय कृषीहवामान सल्ला पाहण्यासाठी मेघदुत मोबाईल अॅपचा आणि वीज पडण्याची पूर्वसूचना मिळवण्यासाठी दामिनी मोबाईल अॅपचा वापर करावा. |

## संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| पेरणीयोग्य पाऊस झाल्याने जमिनीतील ओलावा लक्षात घेऊन वाफसा आल्यास पिकांची पेरणी करावी. |

## पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | पिकात तण नियंत्रणासाठी आंतरमशागतीची कामे आणि सोबतच विरळणी करून घ्यावीत. कोरडवाहू कापूस: पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्याने वाफसा आल्यास लवकर करून घ्यावी. बीजप्रक्रिया: थायरम बुरशीनाशकाची प्रक्रिया प्रति किलो बियाण्यास ३ ग्रॅम तसेच अॅझोटोबॅक्टर किंवा अॅझोस्पिरीलम जीवाणू संवधर्काची प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम या प्रमाणात प्रक्रिया करावी. |
| सोयाबीन | पिकात तण नियंत्रणासाठी आंतरमशागतीची कामे आणि सोबतच विरळणी करून घ्यावीत. पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्याने वाफसा आल्यास लवकर १५ जुलै पर्यंत करून घ्यावी. बीजप्रक्रिया: बुरशीजन्य रोगांपासून संरक्षण करण्यासाठी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा चोळावे. तसेच नत्र स्थिरीकरणासाठी रायझोबियम २५० ग्रॅम + स्फुरद विरघळविणारे जीवाणू २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास चोळावे. खत मात्रा: चांगले कुजलेले शेण खत किंवा कंपोस्ट खत हेक्टरी १२ ते १५ टन वापरावे तसेच पिकास हेक्टरी ५० किलो नत्र, ७५ किलो स्फुरद आणि ४५ किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. |
| मका | पिकात तण नियंत्रणासाठी आंतरमशागतीची कामे आणि सोबतच विरळणी करून घ्यावीत. पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्याने वाफसा आल्यास लवकर १५ जुलै पर्यंत करून घ्यावी. बीजप्रक्रिया : २ ते २.५ ग्रॅम थायरम/किलो तसेच २५ ग्रॅम अँझोटोबँक्टर प्रति किलो बियाण्यास वापरावे. खतमात्रा : पेरणीच्यावेळी ४० किलो नत्र, ६० किलो स्फुरद, ४० किलो पालाश प्रति हेक्टर द्यावे. |
| तूर | पिकात तण नियंत्रणासाठी आंतरमशागतीची कामे आणि सोबतच विरळणी करून घ्यावीत. आंतर मशागत: पेरणीनंतर पिकात १५ ते २० दिवसानंतर कोळपणी करावी. अधिक उत्पादनासाठी पीक पेरणीनंतर ३०-४५ दिवस शेत तणविरहीत ठेवावे. पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्याने वाफसा आल्यास लवकर १५ जुलै पर्यंत करून घ्यावी. बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रतिकिलो बियाणास ५ ग्रॅम ट्रायकोडर्माची बीजप्रक्रिया करावी. यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम जिवाणु संवर्धन १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणातून चोळावे. खत मात्रा: हेक्टरी २५ किलो नत्र व ५० किलो स्फुरद म्हणजेच १२५ किलो डीएपी पेरणीचे वेळी द्यावे. |
| ज्वारी | पिकात तण नियंत्रणासाठी आंतरमशागतीची कामे आणि सोबतच विरळणी करून घ्यावीत. पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्याने वाफसा आल्यास लवकर १५ जुलै पर्यंत करून घ्यावी. बीजप्रक्रिया: १० किलो बियाण्यास २५० ग्रॅम अॅझोटोबॅक्टर किंवा अँझोस्पिरीलम हे जिवाणूखत चोळावे. खत व्यवस्थापन: पेरणीच्या वेळी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. |
| उडद | पिकात तण नियंत्रणासाठी आंतरमशागतीची कामे आणि सोबतच विरळणी करून घ्यावीत. पिकाची पेरणी पुरेसा पाऊस झाल्याने वाफसा आल्यास लवकर करून घ्यावी. बीजप्रक्रिया: पेरणीपूर्वी प्रति किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणूची पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळून लावावी. खतमात्रा: १०० किलो डीएपी प्रति हेक्टरी द्यावे. शक्यतो रासायनिक खते ही चांगल्या कुजलेल्या शेणखतामध्ये मिसळून बियाणालगत द्यावी म्हणजे त्याचा प्रभाव चांगला होतो. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | पावसाळ्यात ओल्या आणि कोवळ्या हिरव्या चा-याचे प्रमाण अधिक असल्याने जनावरांना योग्य त्या प्रमाणात हिरवा चारा खाऊ घालावा म्हणजे जनावरांना पोटफुगी होणार नाही.तसेच पावसाळ्यात साचलेल्या गढूळ पाण्याचे प्रमाण अधिक असल्याने जनावरांना हगवण होणार नाही याची काळजी घ्यावी. |

## हवामान चेतावण्यांचे संभाव्य प्रभाव (सामान्य):

सोसाट्याच्या वाऱ्यामुळे कमकुवत झाडे किंवा कमकुवत इमारती कोसळणे. स्थानिक आणि अल्पकालीन वीजपुरवठा खंडित होणे. जोरदार वारा वृक्षारोपण, बागायती आणि उभ्या पिकांचे नुकसान होऊ शकते. कच्च्या घरांचे/भिंतींचे आणि झोपड्यांचे किरकोळ नुकसान. सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान होऊ शकते.

## परिणाम आधारित सल्ला (सामान्य):

शेतातील जास्तीचे पाणी काढून टाकावे.

**Farmers are advised to download Unified �Mausam� and "Meghdoot" android application on mobile for Weather forecast and weather based Agromet Advisories and "Damini" android application for forecast of Thunderstorm and lightening.**

**Mausam MobileApp link: https://play.google.com/store/apps/details/**

**Meghdoot MobileApp link: https://play.google.com/store/apps/details**

**Damini MobileApp link : https://play.google.com/store/apps/details**